# प्रसिद्धिपत्रक

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६**
**फोन नं. ०२०-२६६८५०००**

**जा.क्र./पोउआ/वाह/ २०३० /२०२५** **पुणे दिनांक - १० /३/२०२५**

पुणे शहरात सध्या रमजान महिना सुरु असुन कोंढवा वाहतूक विभागांतर्गत शितल चौक, अशोका म्युझ सोसायटी, पारगेनगर, कौसरबाग येथे रमजान महिण्यामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. सदर भागातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, कोंढवा वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. सदर ठिकाणी यापर्वी काही पार्किंग संदर्भातील आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे.

**रमजान सणाचे अनुशंगाने कोंढवा वाहतुक विभाग पुणे अंतर्गत शितल चौक, अशोक म्युझ सोसायटी, पारगेनगर, कौसरबाग येथील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी दि. ११/०३/२०२५ ते रमजान महिना संपेपर्यंत दररोज सायंकाळी १७.०० वा. ते २४.०० वा. पर्यंत वाहतुकी मध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.**

➢ **ज्योती हॉटेल चौकातुन डावीकडे वळुन मेफेअर जक्शंन मार्गे पारगेनगर कडे जाणारी सर्व जड वाहतुक व पाण्याचे टँकर यांना बंदी करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग - सदर वाहनांनी सरळ ज्योती हॉटेल चौक ते शितल चौक मार्गे पारगेनगर या पर्यायी मार्गाने जावे.**

➢ **पारगेनगर येथुन मेफेअर जंक्शन मार्गे ज्योती हॉटेल कडे जाणारी सर्व जड वाहतुक व पाण्याचे टँकर यांना बंदी करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग - सदर वाहनांनी पारगेनगर चौक ते शितल चौक मार्गे ज्योती हॉटेल चौक या पर्यायी मार्गाने जावे**

➢ **सर्वोदय जंक्शन चौक येथुन कौसरबागकडे जाणारी सर्व जड वाहतुक व पाण्याचे टँकर यांना बंदी करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग - सदर वाहनांनी मेफेअर मार्गे ज्योती हॉटेल चौक या पर्यायी मार्गाने जावे**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक –१० /३ /२०२५ ते दिनांक – २५ /३ /२०२५ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकतींचा विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**(अमोल झेंडे)**
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

**प्रति,**

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे-०१

२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :- २)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक,** पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर